# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक ०३ ऑगस्ट, २०१७ / श्रावण १२, १९३९ ( शके )**

**(१) आदिवासी विकास मंत्री**
**(२) उद्योग व खनिकर्म मंत्री**
**(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**
**(४) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**
**(५) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५५**

---

## राज्यातील वसतिगृहात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्याबाबत

**(१) * ३१३४१ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७११४ ला दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इयत्ता ११ वी, १२ वी आणि व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळालेल्या परंतु कोणत्याही शासकीय किंवा महाविद्यालयाच्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधांसाठी थेट अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेबाबतचा शासन निर्णय दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाने निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २०१६-१७ करिता आवश्यक रुपये ८१,४०,५९,०००/- इतका निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त संपूर्ण निधी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या प्रारंभापासून उपलब्ध करण्यात आला आहे काय, त्यापैकी किती निधी प्राप्त झाला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदर निधी केव्हा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१६-१७ मध्ये ७११० विद्यार्थ्यांची निवड डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत करण्यात आली होती. त्यासाठी आवश्यक निधी ३६,७१,२८,०००/- इतका आहे.

(३) सन २०१६-१७ आणि सन २०१७-१८ करिता एकूण २०९.०९९६ कोटी इतकी पुरवणी मागणी सन २०१७ चे पावसाळी अधिवेशनात सादर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मार्गताम्हाणे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील प्रस्तावित एमआयडीसी रद्द करणेबाबत

**(२) * ३१५८८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मार्गताम्हाणे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे सन २०१० मध्ये ३ हजार ३०० हेक्टर जमीन संपादित करण्याची प्रक्रिया महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने सुरु केली असून अद्यापपर्यंत कोणत्याच प्रकारची कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता ६ अ ची नोटीस काढण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचे खरेदी-विक्री, हस्तांतरण तसेच निवासी प्रयोजन वापराकरिता लागणाऱ्या सर्व परवानग्या थांबविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक शेतकऱ्यांचा जमीन देण्यास विरोध असून याठिकाणी पर्यटनदृष्ट्या निवासी संकुले, फळबागायती व शेती याकरिता जास्त मागणी असल्याने मार्गताम्हाणे एमआयडीसी रद्द करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) अशी बाब नाही.

महामंडळाने संयुक्त मोजणीसाठी उप अधिक्षक भुमी अभिलेख, चिपळूण व गुहागर यांचेकडे मोजणी फी उपलब्ध करून देण्यात आली मात्र विरोधामुळे संयुक्त मोजणी होऊ शकली नाही.
(२) हे खरे आहे.

तत्कालीन प्रादेशिक अधिकारी, रत्नागिरी यांनी जमीनधारकांच्या ७/१२ खाते उताऱ्यावर भूसंपादनाकरीता शिक्के पडल्यामुळे सदर जागेवर घरबांधणी वा इतर बांधकामे तसेच वृक्ष लागवड इ. परवानग्या देण्यात येवू नये असे पत्र दिलेले होते. तथापि, भूसंपादन प्रक्रिया प्राथमिकस्तरावर असल्याने सदर पत्र मागे घेण्यात आले आहे.
(३) व (४) यासंदर्भात सह मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी दिनांक ७/७/२०१७ रोजी उपविभागीय अधिकारी, चिपळूण तसेच प्रादेशिक अधिकारी, रत्नागिरी यांचेसमवेत संयुक्त बैठक घेवून सदर क्षेत्र विनाअधिसूचीत करण्याबाबतचा पडताळणी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

-----------------

## चंद्रपूर, कोराडी आणि परळी येथील विद्युत प्रकल्पांसाठी वाढीव निधीच्या उपलब्धतेबाबत

**(३) * ३२३०२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महानिर्मिती कंपनीच्या चंद्रपूर, कोराडी आणि परळी औष्णिक विद्युत प्रकल्पातील संच उभारणीच्या रुपये २३ हजार १११ कोटी वाढीव खर्चास मा.राज्य मंत्रीमंडळाने दिनांक १६ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पांचा प्रस्तावित मूळ खर्च किती होता, त्यात कोणत्या कारणांमुळे व किती वाढ झालेली आहे,
(३) असल्यास, उक्त वाढीव खर्चानुसार कोणत्या प्रकल्पांवर किती खर्च करण्यात येणार आहे, सदर प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत आणि त्यातून किती वीज निर्मिती होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) चंद्रपूर, कोराडी व परळी औष्णिक विद्युत प्रकल्पातील संच उभारणीसाठी अनुक्रमे रुपये ७००४.४२ कोटी, रुपये १४०२६.५९ कोटी व रुपये २०८१ कोटी एवढ्या सुधारित खर्चास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.
(२) सदर विद्युत प्रकल्पांचा मूळ अंदाजित खर्च व त्यामध्ये झालेली वाढ याचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

| प्रकल्पाचे नाव | मूळ खर्च रु. कोटी | सुधारित खर्च रु. कोटी | झालेली वाढ |
|---|---|---|---|
| चंद्रपूर | रु. ५५०० | रु. ७००४.४२ | रु. १५०४.४२ |
| कोराडी | रु. ११८८० | रु. १४०२६.५९ | रु. २१४६.५९ |
| परळी | रु. १३७५ | रु. २०८१.३० | रु. ७०६.३० |

प्रकल्पाच्या खर्च वाढीची कारणे खालील प्रमाणे आहेत:-

१. मुख्य संयंत्र (BTG) व उर्वरित संयंत्र (BOP) कार्यादेश किंमत व किंमतीतील चढ उतार
२. मुख्य संयंत्र (BTG) व उर्वरित संयंत्र (BOP) व्यतिरिक्त खर्च
३. व्यवस्थापन खर्च व इंधन खर्च,
४. बांधकाम काळातील व्याज (IDC)
५. आकस्मिक खर्च
६. आस्थापना खर्च इ.

(३) वर नमूद केल्याप्रमाणे सदर प्रकल्पांवर सुधारित खर्च अपेक्षित आहे :-

या व्यतिरीक्त सदर प्रकल्पांच्या वाणिज्यिक तत्त्वावर कार्यान्वयनांच्या तारखापर्यंत अतिरिक्त खर्च अपेक्षित आहे. सदर प्रकल्प पूर्ण झालेले असून त्यांच्या वाणिज्यिक तत्त्वावर कार्यान्वयनांच्या तारखा खालील प्रमाणे आहेत :-

१. चंद्रपूर संच क्र. ८ : दिनांक ०४/०६/२०१६, संच क्र. ९ : दिनांक २४/११/२०१६.

२. कोराडी संच क्र. ८ : दिनांक १६/१२/२०१५, संच क्र. ९ : दिनांक २२/११/२०१६, संच क्र. १० : दिनांक १७/०१/२०१७.

३. परळी संच क्र. ८ : दिनांक १९/११/२०१६ वरील संचांव्दारे दरमहा १८६० दशलक्ष युनिटस एवढी वीज निर्मिती होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोराडी, नागपूर येथील निकामी वीज संच विक्रीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४) * ३१६११ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोराडी, नागपूर येथील महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीतील निकामी झालेले ४६५ मे.वॅ. वीज क्षमतेच्या संचाची किंमत बाजारभावानुसार रुपये २५० कोटीपेक्षाही जास्त असतांना केवळ रुपये ६० कोटींना विकल्याने यात गैरव्यवहार झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूरच्या सनविजय रिरोलींग इंजिनिअरींग वर्क्सला सदर संच विकता यावे यासाठी जाणीवपूर्वक जाचक अटी घालण्यात आल्या असल्याने उक्त प्रकरणी चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) मा.लोकप्रतिनिधींकडून निवेदन प्राप्त झाले असून सदर निवेदनात उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत महानिर्मिती कंपनीकडून त्यांना उत्तर पाठविण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळाच्या स्टेट ट्रान्सपोर्ट को.ऑ.बँकेच्या बढती परीक्षेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५) * ३२३३० श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या स्टेट ट्रान्सपोर्ट को.ऑप. बँकेच्या बढतीसाठी घेतलेल्या परिक्षेत गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या प्रकरणात दोषी असलेल्या मुख्य लेखाकार आणि व्यवस्थापकीय संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) कर्मचाऱ्यांच्या बढतीसाठी बँकेने १) बँक निरिक्षक, २) शाखा व्यवस्थापक व ३) उपलेखाकार या तीन पदांसाठी दिनांक १६/४/२०१७ रोजी खातेनिहाय परिक्षा आयोजित करुन निकाल जाहीर केला होता.

मात्र निकाल जाहीर झाल्यानंतर सदर परीक्षेमध्ये गैरव्यवहार झाल्याचे वृत्त दैनिक पुढारी या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झाल्याने परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या १५ कर्मचाऱ्यांनी उत्तरपत्रिकांची फेरतपासणी करण्याबाबत व काही कर्मचाऱ्यांनी फेरपरीक्षा घेण्याबाबतचे अर्ज बँकेस सादर केले. त्यानुषंगाने बँकेच्या अध्यक्षांनी सदर प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्याचा निर्णय घेऊन बढती परीक्षा रद्द केली व त्याप्रमाणे बँकेच्या व्यवस्थापकीय संचालकांनी संबंधित पात्र उमेदवारांना दिनांक २९/६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

सदर परीक्षा रद्द करण्याच्या निर्णयाविरुद्ध बँकेतील मान्यताप्राप्त संघटना "को.ऑप.बँक एम्प्लॉ. युनियन, मुंबई" यांनी औद्योगिक न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. युएलपी २७१/१७ दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी येथील राष्ट्रीय व राज्य महामार्गालगतचे मद्य विक्री परवाने देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करणेबाबत

**(६) * ३३८७८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील राष्ट्रीय व राज्य महामार्गालगतचे मद्य विक्री परवाने अंतरनिर्बंधमुक्त असल्याबाबतचा विसंगत अहवाल सादर करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल सादर करण्याचे आदेश आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अ.शा. पत्र क्र.-FLR-१११३/६६६/७ दिनांक २८ जून, २०१३ च्या आदेशाप्रमाणे जिल्हाधिकारी, परभणी यांनी अशा दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करून त्याबाबतचा अहवाल आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे सादर केला आहे काय,

(३) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) नाही. अंतरनिर्बंधात एकही अनुज्ञप्ती आढळली नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(७) * ३३४०२ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे २४ जिल्ह्यातील चार हजार ८३२ शेतकऱ्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी गायी व म्हशी खरेदीकरीता कोटयवधी रुपयांचे कर्ज वाटप केले, परंतू त्यावरील शासकीय अनुदानाची रक्कम बहुतांश शेतकऱ्यांना अद्यापही मिळालेली नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कर्जाच्या व्याजाची वसूली बँकानी आता सुरु केली असून शेतकऱ्यांना सुमारे पाच वर्षाच्या व्याजाची रक्कम भरावी लागणार असल्याने याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तूत प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) अनुदानाची रक्कम मंजूर करण्याची बाब नाबार्डशी संबंधित आहे. नाबार्डने यासंदर्भात केंद्र शासनाचे मार्गदर्शन मागविल्याचे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील विशेष लेखापरिक्षक व अप्पर उपलेखा परिक्षक वर्ग-१ ही कार्यालये धोकादायक इमारतीत असल्याबाबत

**(८) * ३२८५२ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक तसेच सहकारी संस्था ही कार्यालये गावदेवी मंडई येथील महापालिकेच्या नव्या इमारतीत स्थलांतरित करण्यात आली, परंतु नौपाडा विभागातील विशेष लेखापरिक्षक आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागील बाजूस कडबा लेन येथील अप्पर उपलेखा परिक्षक वर्ग-१ ही दोनही कार्यालये अद्यापही धोकादायक इमारतीत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धोकादायक इमारतीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जीवास धोका असल्याने याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कार्यालये नवीन इमारतीत स्थलांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय
(२) स्थलांतराबाबत कार्यवाही चालू आहे.
(३) लागू नाही.

-----------------

## आदिवासी आश्रमशाळांमधील अधिक्षक व गृहपालांची रिक्त पदे भरणेबाबत

**(९) * ३३२७९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक २८८९३ ला दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासी विकास विभागाच्या मुला/मुलींच्या ५५२ निवासी आश्रमशाळांपैकी ५३१ निवासी आश्रमशाळांमधील अधिक्षक व गृहपाल (पुरुष व महिला) यांची ३२५ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उपलब्ध अधिक्षक व गृहपाल यांचेवर अतिरिक्त ताण पडत असल्याने वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ३२५ रिक्त जागा भरणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय,

अधिक्षक व गृहपाल (पुरूष व महिला) या संवर्गाची ४९९ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही,

निवासी शासकीय आश्रमशाळांमध्ये अधिक्षक व स्त्री अधिक्षिकांच्या रिक्त पदावर त्याच आश्रमशाळेतील प्राथमिक शिक्षिकेकडे स्त्री अधिक्षिका व प्राथमिक शिक्षक पुरुष यांचेकडे अधिक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

त्याचप्रमाणे शासकीय वसतिगृहातील गृहपाल संवर्गाच्या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार जवळच्या वसतिगृहातील गृहपालाकडे सोपविण्यात आलेला आहे.

(३) अधिक्षक, स्त्री अधिक्षिका व गृहपाल (पुरुष व महिला) या संवर्गाची २८७ रिक्त पदे भरण्यासाठी परिक्षा घेण्यात आली असून प्रक्रिया अंतिम टप्यात आहे.

-----------------

## बिलोशी (ता.वाडा, जि.पालघर) येथे महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ यांना मारहाण केल्याबाबत

**(१०) * ३४०६२ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिलोशी (ता.वाडा, जि.पालघर) येथील श्री.प्रविण पाटील या इसमाने महावितरणचे कर्मचारी श्री.प्रकाश पाटील यांना विजेची चोरी पकडल्याच्या कारणास्तव दंडुक्याने बेदम मारहाण केली असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणच्या खानिवली कार्यालयात श्री.प्रकाश पाटील हे वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असून त्यांनी विभागाने वीज चोरी पकडण्याच्या मोहिमेंतर्गत केलेल्या कार्यवाहीचा राग मनात ठेवून श्री.प्रविण पाटील यांनी मारहाण केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) वीज चोरी पकडण्याच्या मोहिमेंतर्गत श्री. प्रविण पाटील यांची दिनांक १८/०४/२०१७ रोजी वीज चोरी पकडण्यात आली होती. त्यानुसार २७३९ युनिटचे रुपये २९८८० रक्कमेचे वीज बिल त्यांना देण्यात आले होते व फिर्याद क्र. १५४८ दिनांक २५/०४/२०१७ नुसार महावितरण पोलीस स्टेशन, कल्याण येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

(३) दिनांक २२/४/२०१७ रोजी श्री. प्रविण पाटील यांनी बिलोशी गावचे जनमित्र श्री. प्रकाश पाटील हे त्यांच्या कर्तव्यावर कार्यरत असतांना त्यांना मारहाण केल्यामुळे त्यांच्यावर दिनांक २२/०४/२०१७ रोजी वाडा पोलीस स्टेशनमध्ये भादंविस ३५३, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आलेला आहे व त्याच्या फिर्याद क्र. १-८०/१७ दिनांक २२/०४/२०१७ असा आहे. त्याबाबत पोलीसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अपंगांच्या विशेष व कर्मशाळांमधील रिक्त पदे भरुन अनुदान देण्याबाबत

**(११) * ३२२०४ श्री.कपिल पाटील, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक २८४८४ ला दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या विशेष शाळा व कर्मशाळा यांना अनुदान न मिळणे, जून्या अपंगांच्या संस्थांना १२ वर्षापासून कर्मचारी पदे मंजूर नसणे तसेच रिक्त होणाऱ्या विशेष शिक्षकांच्या पदासाठी एनओसी आवश्यक असणे इत्यादी शासन निर्णयातील अटी रद्द करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.सामाजिक न्याय मंत्री यांना माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १८ वर्षे पूर्ण केलेल्या विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी कर्मशाळा नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया येथील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना झालेल्या संसर्ग रोगावर उपचार करण्याबाबत

**(१२) * ३२१३९ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया येथील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना झालेल्या बाधा तवा नामक त्वचा संसर्ग रोगावर उपचाराऐवजी शाळेकडून मांत्रिकाद्वारे पूजापाठ करण्यात येत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रोगावर उपचाराऐवजी मांत्रिकाद्वारे पूजापाठ करणाऱ्या आश्रमशाळा प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

तथापि, माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये नामांकित निवासी शाळा योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या किरसान इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, गोरेगाव, जि.गोंदिया या खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना त्वचा रोगाचा संसर्ग झाला होता, ही वस्तुस्थिती आहे.

(२) उपरोक्त घटनेच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, देवरी यांनी चौकशी केली असता त्वचा रोग लागण झालेल्या विद्यार्थ्यांवर शाळा प्रशासनामार्फत जिल्हा सामान्य रूग्णालय तसेच खाजगी दवाखान्यामधून आवश्यक औषधोपचार केले असल्याचे आढळून आले. मात्र विद्यार्थ्यांवर उपचार न करता सदर शाळेच्या संस्थाचालकांनी अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन मांत्रिकाकडून पूजापाठ करून घेतलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण कृषी बाजार समिती विक्रेत्यांकडून अनामत रकमेची मागणी करित असल्याबाबत

**(१३) * ३१२५७ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीने फुलबाजाराची उभारणी बाजार समिती स्वखर्चाने करणार असल्याने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे कल्याण फुल बाजार विभागाचे नकाशे व आराखडे मंजुरीची मागणी केली असल्याचे दिनांक २७ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या पत्रात नमूद केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेचे भाडेकरू आहेत त्यांना नव्याने बांधण्यात येणाऱ्या इमारतीच्या तळमजल्यावर गाळे देण्याच्या अटीवर कल्याण-डोंबिवली मनपा महासभेच्या सर्वसाधारण सभेस क्र.०६, दिनांक २०/०८/२०१६ रोजीच्या ठराव क्र.४८ अन्वये मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू फुलबाजारातील मनपाच्या भाडेकरू असलेल्या गाळेधारकांना मनपाने दिनांक २७ फेब्रुवारी, २००३ रोजी रुपये ११,७५०/- इतकी अनामत रक्कम घेऊन २० वर्षासाठी करार करून गाळे वाटप केलेले असताना बाजार समितीने सदरहू व्यापाऱ्यांकडून नवीन इमारतीतील २५ चौ.फुट ओट्यासाठी प्रत्येकी रुपये ३,२५,००० इतकी अनामत रक्कम भरण्याची मागणी केली असल्याची तक्रार फुल विक्रेत्यांनी मा.मुख्यमंत्री, प्रधान सचिव, नगरविकास, प्रधान सचिव, कृषी, प्रधान सचिव, सहकार व पणन आणि संचालक, पणन यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख** : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्याखालील नियम १९६७ मधील तरतुदींच्या आधारे योग्य ती चौकशी करण्याबाबत पणन संचालक, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

-----------------

## राज्यात विशेषत: नाशिक येथे फळे-भाजीपाला विक्री केंद्र सुरु करणेबाबत

**(१४) * ३२०१९ डॉ.अपूर्व हिरे : दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक २१२२९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिल्लीच्या धर्तीवर शेतकऱ्यांना फायदेशीर ठरलेली राष्ट्रीय डेअरी विकास महामंडळाची फळे व भाजीपाला विक्री केंद्रे सुरु करण्याबाबत दिनांक १८ जून, २०१६ च्या पत्राद्वारे मार्गदर्शन करण्याची विनंती राज्य शासनाकडून राष्ट्रीय डेअरी विकास मंडळास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाची फळे व भाजीपाला केंद्रे राज्यात सुरु करण्याबाबत सामंजस्य करार करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच नाशिक जिल्ह्यात द्राक्ष, डाळींब, अन्य फळे व भाजीपाल्याचे दर्जेदार व उत्तम प्रतीचे मोठ्या प्रमाणावर होणारे उत्पादन विचारात घेता नाशिक येथे सदरहू फळ व भाजीपाला विक्री केंद्र सुरु करण्याबाबत स्थानिकांकडून होत असलेल्या मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) मंत्री (पणन) यांनी दिनांक १६ एप्रिल, २०१६ रोजी दिल्ली येथे नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाने (एन.डी.डी.बी.) सुरु केलेल्या 'सफल' च्या वितरण केंद्राला भेट देवून दिल्ली शहरात ताजी फळे व भाजीपाला वितरण व्यवस्थेची पाहणी केली आहे. या पाहणीनंतर एन.डी.डी.बी.ला दिनांक १८/०६/२०१६ रोजीच्या पत्राद्वारे राज्यातील पणन विभागाशी संबंधित माहिती देऊन त्यांच्या मदतीने राज्यात प्रकल्प सुरु करण्यासाठी मार्गदर्शन करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

(३) शेतकऱ्यांना आपली फळे व भाजीपाला थेट ग्राहकांना विक्री करण्यासाठी राज्यामध्ये संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडे बाजार अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक १२/०८/२०१६ रोजी घेतला असून या अभियानांतर्गत नाशिक जिल्ह्यातील शेतकरी/ शेतकरी गट/शेतकरी उत्पादक कंपन्या यांच्या माध्यमातून मुंबई, ठाणे, नवी मुंबई व पुणे येथील शेतकरी आठवडे बाजारांमध्ये थेट ग्राहकांना फळे व भाजीपाला विक्री करण्यात येत आहे.

-----------------

## चोपडा (जि.जळगांव) येथे देशी व विदेशी बनावट मद्यसाठा जप्त केल्याबाबत

**(१५) * ३४२२८ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगांव) शहरातील राज्य मार्गापासून ४०० मीटरच्या अंतरावरील एका भाडयाच्या गाळयातून रुपये ५ लाख ७१ हजारांचा देशी व विदेशी बनावट मद्यसाठा राज्य उत्पादन शुल्क विभागाने जप्त केल्याचे दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५ व १०८ अन्वये गु.रजि. क्र.१७८/२०१७, दिनांक ६/६/२०१७ नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणात एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गगनबावडा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील सेवा संस्थांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१६) * ३०९०८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गगनबावडा तालुक्यातील (जि.कोल्हापूर) (अ) श्री दत्त विकास सेवा संस्था मर्या. कोदे खुर्द. (ब) श्री पांडुरंग विकास सेवा संस्था मर्या. कोदे बु||, (क) श्री ज्योतिर्लिंग विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था, असंडोली, (ड) श्री विठ्ठलाई विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था, तळेय बु||, (इ) श्री दत्त विकास सेवा संस्था मर्या. तळये बु||, (फ) श्री.पी.जी. शिंदे वि.का.स. सेवा संस्था मर्या. कोदे बु|| (ठाकूरवाडी), (ह) श्रीमान महादेव शिंदे वि.का.स सेवा संस्था मर्या. कोदे खुर्द या संस्थांनी महसूल विभागाकडील खोटे दाखले व त्यावर खोटया सहया आणि खोटे शिक्के वापरुन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, गगनबावडा येथील कार्यालयातून संस्थांची नोंदणी प्रमाणपत्रे प्राप्त केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर फौजदारी स्वरुपाची कारवाई होऊन संस्थांची प्रमाणपत्रे रद्द झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशतः खरे आहे.

(२) होय,

(३) होय. खोट्या कागदपत्रांच्या आधारे नोंदणी केलेल्या (१) श्री ज्योतिर्लिंग वि.का.स. सेवा संस्था मर्या., असंडोली, (२) श्री पांडुरंग वि.का.स. सेवा संस्था मर्या., कोदे बु||, (३) श्री दत्त वि.का.स. सेवा संस्था मर्या., कोदे खुर्द, (४) श्रीमान महादेव हरी शिंदे वि.का.स. सेवा संस्था मर्या., कोदे खुर्द, (५) श्री. विठ्ठलाई वि.का.स. सेवा संस्था मर्या., तळये बु|| (६) श्री.पी.जी. शिंदे वि.का.स. सेवा संस्था मर्या., कोदे बु||, आणि (७) श्री.पी.जी. शिंदे वि.का.स.

सेवा संस्था मर्या., तळये बु||, अशा संस्थांच्या प्रवर्तकावर गगनबावडा, पोलीस ठाणे येथे फौजदारी गुन्हे दाखल केलेले आहेत. पोलीस निरीक्षक, गगनबावडा यांचेमार्फत गुन्ह्याचा तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांचे थकीत वीज बील माफ करण्याबाबत

**(१७) * ३२८३४ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या वीज बिलाची वसूली केवळ १९.८९ टक्के असून रुपये १८ हजार कोटींची वीज बिले थकीत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील काही वर्षात दुष्काळामुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांचे थकीत वीज बील माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सन २०१६-१७ मध्ये वीज बिलांची वसुली १३.८५ टक्के आहे. मार्च, २०१७ अखेर रुपये १९१३१ कोटी थकबाकी कृषी ग्राहकांकडून येणे बाकी आहे.
(२) सन २०१४ ते २०१७ या वर्षात कृषी ग्राहकांना नियमित अनुदान रुपये १३६०८.३९ कोटी याव्यतिरिक्त दुष्काळग्रस्त कृषी ग्राहकांना वीज बिल सवलतीपोटी रुपये १५२९.८७ कोटी व कृषी संजीवनी योजनेंतर्गत कृषी ग्राहकांना रुपये ४२९.४४ कोटी वीज बिलात सवलत देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम देण्याबाबत

**(१८) * ३३३३६ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पीक विम्याचे रुपये २५० कोटी एच.डी.एफ.सी. बँकेत फिक्स डिपॉझीटमध्ये गुंतविले असल्याने त्यासंदर्भात लेखी तक्रार जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुंतवणूक नियमबाह्य असून यासाठी बँकेने शासनाची पूर्व संमती घेतली आहे काय तसेच येथील शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम कधी वितरीत करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय. अशा प्रकारची तक्रार दिनांक ०४/३/२०१७ रोजी प्राप्त झाली असून त्यामध्ये बँकेने पीक विम्याचे रूपये २२५ कोटी मुदत ठेवीत गुंतविल्याचे नमूद आहे.

(२) रब्बी हंगाम सन २०१५ चा पिक विमा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, बीड या बँकेस दिनांक ०२/०३/२०१७ रोजी रक्कम रूपये २२५ कोटी १२ लाख प्राप्त झाला होता. सदरील पिक विमा मुख्य कार्यालयाने दिनांक ०४/०३/२०१७ रोजी संबंधित शाखांना वर्ग केल्यानंतर शाखांनी सर्व लाभधारकांच्या खात्यात रकमा वर्ग केल्या व लाभधारकांच्या मागणीनुसार शाखास्तरावरून रक्कम उपलब्धतेनुसार प्रत्यक्ष वितरण चालू आहे.

(३) सद्यस्थितीत सर्व शाखांमधून वाटप चालू असून बँकेस करन्सी चेस्ट बँकेकडून मागणीनुसार पुरेशा प्रमाणात रोख रक्कम न मिळाल्याने प्रत्यक्ष रक्कम अदा करण्यास विलंब झाला असल्याबाबत बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांना कळविले आहे.

-----------------

## आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या गैरसोईबाबत

**(१९) * ३४३३१ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक २८३०४ ला दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना वेळेत जेवण, अल्पोपहार न मिळणे तसेच सडक्या-कुजक्या फळांचा पुरवठा अनियमित होत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे तज्ञांकडून केलेल्या सर्वेक्षणादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरिता आदिवासी विकास विभागाकडून प्रतिवर्षी रुपये ५०० कोटी खर्च होऊनही आदिवासी विद्यार्थ्यांची प्रगती न होता त्यांचा शैक्षणिक दर्जा खालावत असल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील जव्हार आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत २९ शासकीय आश्रमशाळांमधील निवासी वसतिगृहात राहणाऱ्या १७ हजार ५५० विद्यार्थ्यांकडे आदिवासी विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अल्पोपहार, दोन वेळचे पौष्टिक जेवण, दुध, अंडी व केळी देण्यात येतात. तसेच स्वच्छ पिण्याचे पाणी व आरोग्य तपासणी इत्यादी सोयीसुविधा पुरविण्यात येतात. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे संध्याकाळचे जेवण व सकाळचा नाश्ता यामध्ये अधिक अंतर होऊ नये म्हणून जेवणाच्या वेळेत बदल करण्यात आला आहे.

(२) आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा खालावत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) व (४) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना देय सोयीसुविधा पुरविण्यात येत आहे.

-----------------

# कांदिवली मुंबईतील उपनगर येथील जमिनीचा गैरवापर होत असल्याबाबत

**(२०) * ३२६३४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कांदिवली (प.) (ता.बोरीवली, मुंबई उपनगर) महावीर नगर, कांदिवली लिंक रोड, म्हाडा कॉलनी येथील रुखी भवन समाजकल्याण केंद्राला सामाजिक कार्याकरिता मंजूर केलेल्या जमिनीच्या गैरवापराबाबत युनायटेड असोसिएशन फॉर सोशल एज्युकेशनल आणि पब्लिक वेल्फेअर ट्रस्ट यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीची गंभीर दखल घेत शासनाने चौकशी करुन या संस्थेवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या अहवालानुसार अशा प्रकारची तक्रार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे दिनांक १०/४/२०१७ रोजी करण्यात आलेली आहे.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने दिनांक ८/५/२०१७ च्या पत्रान्वये संस्थेसोबत केलेल्या करारनाम्याच्या उल्लंघनासंदर्भात त्या संस्थेकडून खुलासा मागविला होता. त्यानुसार, सदर संस्थेने जिल्हा नियोजन समिती, मुंबई उपनगर यांचेकडे सादर केलेला खुलासा, उपरोक्त तक्रार तसेच नुतणीकरणाबाबत प्राप्त प्रस्तावासंदर्भात छाननी करुन योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शेतकऱ्यांकडून हमी भावापेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२१) * ३०९६७ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांकडून हमी भावापेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी करणे हा गुन्हा ठरविण्याचा निर्णय जामनेर (जि.जळगांव) येथे मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात कायद्यातील तरतुदी स्वयंस्पष्ट असतानाही व सोयाबीन, तूर यासारख्या सर्व कृषीमालाची हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई होत नसल्याबाबत लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनास पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार दोषी आढळलेल्यांवर गुन्हा दाखल करुन कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) यासंदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली असून हमी भावापेक्षा कमी किंमतीत FAQ दर्जाचा शेतमाल खरेदी केल्यास तो गुन्हा ठरविण्यासाठी पणन अधिनियमात सुधारणा करण्याबाबत पणन संचालकांकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाला असून सदर प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(२) शेतकऱ्यांकडून हमी भावापेक्षा कमी भावाने शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत व पोलीस अधिक्षकांमार्फत गुन्हे दाखल करण्याबाबत केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती लोकप्रतिनिधींनी दिनांक ०६/०६/२०१७ च्या पत्रान्वये शासनास मागितली आहे.

(३) दिनांक ०६/०६/२०१७ च्या लोकप्रतिनिधींच्या पत्राच्या अनुषंगाने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून सविस्तर माहिती मागविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: कोल्हापूर जिल्हा बँकांमध्ये चलन तुटवडा होत असल्याबाबत

**(२२) * ३१५२३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, अ‍ॅड.निरंजन डावखरे, अ‍ॅड.राहुल नार्वेकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा बँकांमध्ये शेतकरी, विकास सहकारी संस्था व दुग्धसंस्थांचे नोटा बंदीमुळे रुपये ८५०० कोटीचे रद्द झालेले चलन रिझर्व्ह बॅंकेने बदलुन दिले नसल्याने जिल्हा बँकांमध्ये चलन तुटवडा निर्माण झाल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या १९१ शाखांना शेतकऱ्यांचे पीक कर्ज व मध्यम मुदत कर्ज वितरण, दुध बिले, शिक्षक पगार, पेन्शन यासाठी प्रतिदिन रुपये ३ ते ३५ कोटीची आवश्यकता असताना करन्सी स्टेट बॅंक केवळ रुपये २ ते ५ कोटी देत असल्यामुळे बँकेच्या खातेदारांस त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील ३१ जिल्हा बँकांमध्ये सुमारे रुपये ५००० कोटी जुन्या चलनाच्या नोटा पडून असून या बँकांची ‘नाबार्ड’ ने तीन वेळा तपासणी करुनही रिझर्व्ह बँका नोटा स्वीकारण्यास तयार नसल्याने राज्यातील जिल्हा बँकांची आर्थिक कोंडी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सहकारी बॅकांच्या ग्रामीण भागातील ग्राहकांची चलन तुटवडयामुळे होत असलेली गैरसोय दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

केंद्र शासनाकडील दिनांक २०/०६/२०१७ च्या अधिसूचनेप्रमाणे तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेकडील दिनांक २९/०६/२०१७ च्या पत्राद्वारे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील जुन्या रूपये ५००/- व रूपये १०००/- च्या नोटा जमा करण्याच्या सुचना प्राप्त झाल्या आहेत.

(४) चलन तुटवड्याच्या परिस्थितीमध्ये सुधारणा होण्यासाठी शासनाने वेळोवेळी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठका घेऊन तसेच पत्राद्वारे पाठपुरावा केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यागांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२३) * ३१५३४ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांगासाठी अनुदानित ८५२ व विनाअनुदानित ६८४ अशा एकूण १५३६ कर्मशाळा/विशेष शाळा मागील २० वर्षापासून सुरू असून सदर शाळांमधील अभ्यासक्रम कालबाहय झाल्यामुळे दिव्यांगाना रोजगार उपलब्ध करून देण्यात अपयश येत असल्याचे दिनांक ९ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विशेष शाळा व कर्मशाळातून दिव्यागांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

अपंगांच्या विशेष शाळा/ कर्मशाळांसाठी अपंग शाळा संहिता, १९९७ नुसार पाठयक्रम, कार्यशाळांचे व्यवस्थापन इत्यादी कामकाज केले जाते. अपंगांच्या विशेष शाळा/ कर्मशाळांतून दिव्यांगाना रोजगार उपलब्ध होईल असे कौशल्यविकासाभिमुख शिक्षण/ प्रशिक्षण मिळावे यासाठी संहिता सुधारीत करण्याची कार्यवाही आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्या स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विखरणी (ता.येवला, जि.नाशिक) येथील विद्‌युत उपकेंद्रात अक्षय प्रकाश योजना सुरु करणेबाबत

**(२४) * ३०९५२ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विखरणी (ता.येवला, जि.नाशिक) येथील विद्‌युत उपकेंद्रात अक्षय प्रकाश योजना सुरु करण्यासाठी येवला तालुक्यातील सर्वपक्षीय ग्रामस्थांनी दिनांक २२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास आमरण उपोषण सुरु केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिक्षक अभियंता, नाशिक ग्रामीण मंडळ, मालेगाव यांच्या असहकार्यामुळे सदर योजना सुरु होत नसल्याने विखरणी, आडगावरेपाळ, विसापूर कानडी, कातरणी इ. ग्रामपंचायतींच्या ग्रामसभांमध्ये वीज बील न भरण्याचा ठराव करुन शासनास पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अधिक्षक अभियंता यांची तातडीने बदली करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) अक्षय प्रकाश योजना ही सन २००८ मध्ये कार्यरत होती. सदर योजनेमध्ये एखाद्या फिडरवरील गावांनी कमाल मागणीच्या (Peak Hour) वेळेला (५.०० pm ते १०.०० pm) मध्ये वीजेचा वापर २०% ने कमी केल्यास त्यांना त्या वेळेत भारनियमन करण्यात येत नव्हते. सदर योजना सद्य:स्थितीत बंद करण्यात आलेली आहे. त्यानंतर प्रत्येक वाहिनीवरील वाणिज्य व तांत्रिक हानीनुसार भारनियमनाचे वेगवेगळे गट अनुक्रमे अ,ब,क,ड,इ,जी असे गट बनविण्यात आले व गटाप्रमाणे भारनियमन करण्यात येत होते. सध्या राज्यातील विजेच्या उपलब्धतेमुळे माहे फेब्रुवारी, २०१७ पासून कुठेही भारनियमन होत नाही. परंतु तांत्रिक अडचणी उद्भवल्यास मा. आयोगाच्या निर्देशानुसार विभागावार भारनियमन करण्यात येते.

(३) सदरचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(४) ३३/११ के.व्ही. विखरणी उपकेंद्रातून येवला तालुक्यातील कृषी बहुल वाहिन्यांवर असलेल्या घरगुती व वाणिज्य ग्राहकांकरिता अखंडित वीज पुरवठा करता यावा याकरिता त्या वाहिनींवर दिनदयाल उपाध्याय ग्रामीण विद्युतीकरण योजनाने अंतर्गत SDT बसवून सिंगल फेज योजना सुरु करण्याची निविदा प्रक्रिया प्रगती पथावर असून सदर निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सदर ठिकाणी नवीन SDT बसवून सिंगल फेज ग्राहकांना अखंडित वीज देता येईल.

-----------------

## मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील जानुपाडा व पांडे कंपाऊड रस्त्यावर सौर दिवे लावण्याबाबत

**(२५) * ३३१९८ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील जानुपाडा प्रमुख रस्ता व पांडे कंपाऊंड रस्त्यांवर सौर ऊर्जेचे दिवे बसविणेबाबत लोकप्रतिनिधिंनी मा.ऊर्जा मंत्री यांना दिनांक ०१ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) यासंदर्भात उक्त निवेदनानुसार महाऊर्जामार्फत संबंधित ठिकाणाचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दापचरी (जि.पालघर) प्रकल्पाची जागा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास हस्तांतरीत करण्याबाबत

**(२६) * ३१०५३ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-बडोदा नवीन द्रुतगती महामार्गावर उद्योगधंदे व नवीन कारखाने उभारण्यासाठी पालघर जिल्ह्यातील दापचरी प्रकल्पाची दुग्धविकास महामंडळाच्या ताब्यातील सुमारे साडेसहा हजार एकर जागा हस्तांतर करण्यासाठी उद्योग विभागाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ३ सदस्यांची समिती गठीत केली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणता निर्णय झाला, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

शासनाने गठीत केलेल्या दिनांक २१/०१/२०१७ च्या पहिल्या बैठकीत दुग्ध विकास महामंडळाच्या उपलब्ध असलेल्या ८६०.०० हे.आर जमिनीपैकी पश्चिमेकडील ४६०.०० हे.आर जमीन सलगतेने पहिल्या टप्प्यात उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच उर्वरित मोजणी केलेल्या जमिनीपैकी किती जमीन उपलब्ध करुन देण्यात येणार याबाबत पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने एक महिन्यात समितीस अवगत करावे व सदर जमिनीसाठीचा दर शिघ्रसिध्द गणकाच्या १.५ पट द्यावा, असे समितीने निश्चित केले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील वीज वाहिन्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२७) * ३३५७३ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड (जि.रायगड) तालुक्याच्या प्रस्तावित नवीन विद्युत सबस्टेशन मंजूर होऊनही मुरुड शहरापर्यंत अद्याप वीज वाहिनीचे (एक्सप्रेस फिडर) काम अपूर्णावस्थेत असणे तसेच म्हसळा तालुक्यातील पावरे वीज स्टेशनमधून एक्सप्रेस फिडर लाईन मांदाड पुलावरुन भालगांव मार्गे मुरुड तालुक्यात आणण्याचे काम मंदगतीने सुरु असल्याने अनेक गावांमध्ये १६ तास वीज पुरवठा खंडीत होत असल्याचे माहे जून, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक वीज ग्राहकांनी नियमित व अखंडित वीज पुरवठा व्हावा म्हणून मागील ६ महिन्यांपासून सातत्याने वीज मंडळाच्या कार्यालयाकडे केलेल्या मागणीकडे वीज वितरण मंडळाने दुर्लक्ष केल्यामुळे दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मुरूड येथील वीज मंडळाच्या कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी प्रलंबित विद्युत वाहिनींची कामे जलदगतीने करुन वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मुरुड शहरास ६५ किमी अंतरावरील १००/२२ के.व्ही.धाटाव या अतिउच्चदाब उपकेंद्रावरुन वीज पुरवठा केला जातो. हे अंतर जास्त असल्याने मुरुड (जि. रायगड) शहर व ग्रामीण भागात वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण जास्त आहे. त्याकरिता मुरुड, दत्तवाडी येथे ३३/२२ के.व्ही. नवीन उपकेंद्राचे काम पायाभूत आराखडा-२ योजनेतून पूर्ण करण्यात आले असून त्यास लागणाऱ्या दोन ३३ के.व्ही. इनकमींग फिडरचे एकूण ४० किमी पैकी २३ किमी चे काम पुर्ण झाले असून उर्वरित काम वनखात्याच्या हरकतीमुळे धीम्या गतीने सुरु आहे.

(२) महापारेषण कंपनीने २२० के.व्ही. कांदळगाव उपकेंद्र दिनांक ३०/५/२०१७ रोजी नियमित देखभालीकरीता सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या काळात बंद राहणार असल्याबाबत सूचित केले होते. परंतु कंपनीचे काम ऐनवेळी वाढल्यामुळे सदर उपकेंद्र संध्याकाळी ७.४३ वा. चालू करण्यात आले. त्यामुळे त्या दिवशी दिर्घ काळाकरीता वीज पुरवठा बंद राहिल्याने वीज ग्राहकांनी मुरुड येथील वीज मंडळाच्या कार्यालयावर मोर्चा नेला होता.

(३) मुरुड शहराकरिता पर्यायी उच्चदाब उपकेंद्र उपलब्ध नसल्याने पायाभूत आराखडा-२ या योजनेतून दत्तवाडी ता.मुरुड या ठिकाणी ३३/२२ केव्ही क्षमतेच्या उपकेंद्राचे काम पूर्ण झाले असून इनकमींग फिडरचे काम महावितरण कंपनीमार्फत प्रगतीपथावर आहे. तसेच १०० के.व्ही. पाभरे उपकेंद्रामध्ये ३३ के.व्ही. बे व २५ एमव्हीए (१००/३३) चे काम महापारेषण कंपनीमार्फत प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोड असलेल्या महिलांना निराधारांच्या धर्तीवर वेतन अनुदान मंजूर करणेबाबत

**(२८) * ३१५४३ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पांढरे कोड असलेल्या महिला विशेषतः तरुणींची संख्या मोठ्या प्रमाणावर असून कोड फुटल्यामुळे त्यांच्या विवाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांना निराधारांच्या धर्तीवर प्रतिमाह वेतन अनुदान मंजूर करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या इतर निराधार आणि अपंग कल्याण योजनांच्या धर्तीवर पांढरे कोड बाधित महिला व तरुणींना प्रतिमाह वेतन अनुदान मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) राज्यात पांढरे कोड असलेल्या महिलांना निराधारांच्या धर्तीवर प्रतिमाह वेतन अनुदान मंजूर करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मे, २०१७ मध्ये मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांच्याकडे केली आहे.

याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाकडून अभिप्राय मागविण्यात आले असून सदर महिलांना निराधारांच्या धर्तीवर प्रतिमाह वेतन अनुदान मंजूर करण्याच्या प्रस्तावावर विचारविनिमय सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विद्युत खांबावर दुरुस्ती करताना मृत्यू होत असल्याबाबत

**(२९) * ३०८९८ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विद्युत खांबावर चढून खाजगी लाईनमन दुरुस्तीचे काम करीत असल्याने यात यवतमाळ जिल्हयात आतापर्यंत १५०० पेक्षा अधिक गरीब व्यक्तींचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुढे कोणत्याही लाईनमनने खाजगी लाईनमनला दुरस्तीसाठी खांबावर चढवून दुर्घटना झाली तर संबंधित लाईनमन, शाखा अभियंता व उपअभियंता यांचेविरुध्द एफआयआर नोंदवून मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचे निर्देश मा. ऊर्जा मंत्री यांनी यवतमाळ जिल्हा दौऱ्याचेवेळी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्हातील पांढरकवडा विभागांतर्गत घाटंजी व मोहदा या भागात खाजगी लाईनमनच काम करीत असल्याने लाईनमन सह शाखा अभियंता व उपअभियंता यांचेविरुध्द एफआयआर नोंदवून मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) यवतमाळ जिल्हयात अनधिकृतपणे विद्युत वाहिनीवर काम करत असतांना सन २०१६-१७ मध्ये ४ व सन २०१७-१८ मध्ये १ इतक्या बाहय व्यक्तींना प्राणांतिक विद्युत अपघात झाल्याची नोंद झालेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अशाप्रकारची घटना यापुढे घडल्यास संबंधितांवर महावितरण कंपनीकडून योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर व ठाणे जिल्ह्यात रिलायन्स कंपनीकडून टाकण्यात आलेल्या गॅस वाहिनीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत

**(३०) * ३४२५७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील व ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतातून रिलायन्स कंपनीची गॅस वाहिनी जात असल्याने अनेक गावात पाईपलाईन टाकण्याकरिता खोदकाम केल्याने पावसाचे पाणी नैसर्गिकरितीने वाहून जाणारे मार्ग बंद होऊन भात शेतीचे नुकसान झाले असल्याचे माहे जून, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गॅस वाहिनीकरिता पाईपलाईन टाकण्यासाठी खोदकाम केल्याने अनेक शेतकऱ्यांच्या शेताची यांत्रिक अवजारे घेऊन जाण्याचे मार्गही बंद झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांचे नुकसान भरुन देण्याबाबत व खोदकाम केलेली जमीन पूर्ववत करुन देण्याकरिता उक्त कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

दहेज नागोठाणे ईथेन पाईपलाईन प्रकल्पाची पाईपलाईन टाकण्याचे काम रिलायन्स गॅस पाईपलाईन लि. कंपनीकडून सुरु आहे. पाईपलाईन टाकण्याकरिता खोदकाम जमिनीत पाईपलाईन टाकून झाल्यावर संपादन संस्थेमार्फत जमीन पूर्ववत केली जाते.

(२) हे खरे नाही.

पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर जमीन पूर्ववत केली जाते. त्यामुळे शेतीची यांत्रिक अवजारे घेवून जाण्याचा मार्ग बंद झालेला नाही.

(३) दहेज नागोठाणे ईथेन पाईपलाईन प्रकल्पात वापराच्या हक्कांचे संपादन झालेल्या जमिनीची/ठिकाणची नुकसान भरपाई (जमिनीच्या वापराच्या हक्काच्या संपादनाचा अधिनियम, १९६२ व न्याय नुकसान भरपाई मिळविण्याच्या हक्क आणि पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखणे अधिनियम, २०१३ मधील तरतूदीनुसार) संबंधितांना मोबदला वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे. उक्त अधिनियमाचे कलम १० नुसार संबंधित शेतकऱ्यांना जमीन खोदल्याचे ते जमीन पुर्ववत करुन देण्याच्या कालावधीची पिकांची नुकसान भरपाई देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांबाबत

**(३१) * ३२४६६ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात पाताळगंगा, तळोजा, रोहा, महाड, विळे-भागाड, उसर या औद्योगिक वसाहती तसेच आरसीएफ, आयपीसीएल, ओएनजीसी, जेएनपीटी, रिलायन्स, इस्पात इत्यादी मोठे प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांसाठी जमीन देणाऱ्या ५०० हून अधिक प्रकल्पग्रस्तांचे योग्य पुनर्वसन झालेले नसून जवळपास ४ हजारांपेक्षा जास्त प्रकल्पग्रस्त नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यात नवीन सुरु होणाऱ्या प्रकल्पांमुळे बाधित प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणतीही ठोस भूमिका जाहीर केलेली नसल्यामुळे नविन प्रकल्पांना प्रकल्पग्रस्तांकडून विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रायगड जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत महाड, अतिरिक्त महाड, रोहा, विळे भागाड, शहापूर व नागोठणे औद्योगिक क्षेत्रे आहेत.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात उभारल्या जाणाऱ्या उद्योगांमध्ये उद्योजकांना जमीन वाटप करताना प्रकल्पग्रस्तांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार प्राधान्याने नोकरी देण्याची अट करारनाम्यात अंतर्भूत केली जाते.

(३) व (४) जमिनी संपादन करताना गावठाणे, वाडया, वस्ती इ. क्षेत्र वगळून जमीन संपादन करण्यात येते. त्यामुळे पुनर्वसनाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील उद्योग समूह विकास योजना पूर्ण करण्याबाबत

**(३२) * ३३१६९ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले** : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाच्या विविध योजनांचा समन्वय तसेच शक्य असेल तिथे सामाजिक दायित्व निधी मिळवून सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांची समूह विकास योजना वेगाने पूर्ण करण्याचे आदेश मा.वित्त मंत्र्यांनी दिले असल्याचे माहे मे, २०१७ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय,

(२) राज्यातील सुक्ष्म व लघु उद्योगांच्या सर्वांगीण विकासासाठी उद्योग संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघु उपक्रम-समूह विकास योजना व राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेंतर्गत मंजूरीप्राप्त प्रकल्पांची उभारणी जलदगतीने करणेसाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करून त्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करणेबाबत सर्व उद्योग सह संचालक, विभागीय कार्यालय व सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांना उद्योग संचालनालयामार्फत सूचना देण्यात आल्या आहेत.

सद्य:स्थितीत केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघु उपक्रम-समूह विकास योजनेंतर्गत ९ प्रकल्प पूर्णत: कार्यान्वित झाले असून राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेंतर्गत ४ प्रकल्प पूर्णत: व १ प्रकल्प अंशत: कार्यान्वित झाला आहे.

(३) लागू नाही.

-----------------

## घोलपवाडी (ता.कराड, जि.सातारा) येथील वीज पुरवठा पूर्ववत करण्याबाबत

**(३३) * ३११०२ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोलपवाडी (ता.कराड, जि.सातारा) येथे काही दिवसांपूर्वी झालेल्या वादळी वाऱ्यात वीज वितरण कंपनीचे खांब उन्मळून पडल्याने शेती पंपाचे वीज कनेक्शन बंद पडून शेतीपिकांचे नुकसान झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासदंर्भात संबंधित अधिका-यांना कळवूनही ते दुर्लक्ष करित असल्याने ग्रामस्थांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज खांबांची तातडीने दुरुस्ती करुन वीज पुरवठा सुरळीत करणे तसेच संबंधित दोषीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदर ठिकाणी दिनांक १८ मे, २०१७ रोजी सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे वीज वितरण कंपनीचे खांब पडल्याने शेतीपंपाचा वीजपुरवठा खंडीत झाला होता.

(२) स्थानिक ग्रामस्थांनी विद्युत पुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिनांक २३ मे, २०१७ रोजी एका वर्तमानपत्राद्वारे दिलेला होता.

(३) दिनांक २३/५/२०१७ रोजी वादळामुळे झालेल्या पडझडीचे निवारण महावितरण कंपनीकडून करण्यात आले व वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास महामंडळाकडे आदिवासीं लाभार्थ्यींना वितरीत करण्याचा निधी पडून असल्याबाबत

**(३४) * ३४१९३ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी समाजाचे जीवनमान उंचविण्यासाठी तेलपंप, एस.डी.पी.आर.पाईप आणि अनुषंगिक गोष्टी आदिवासी विकास महामंडळामार्फत आदिवासी लाभार्थींना निधी उपलब्ध करुन देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास महामंडळाकडे मागील ३ वर्षापासून रुपये ५० कोटी पेक्षा जास्त निधी आदिवासी लाभार्थींना वितरणाविना पडून आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने याप्रकरणात दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही. महामंडळामार्फत तेलपंप व एच.डी.पी.ई.पाईप वस्तुस्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येतात.

(२) हे अंशत: खरे आहे. एकुण रुपये ४३,३४,०४,१६५/- एवढी रक्कम अखर्चित आहे.

(३) तेल पंपाचे २०१४-१५ चे वितरण चालू आहे. सन २०१५-१६ ची कार्यवाही चालू असताना दिनांक ५/१२/२०१६ रोजी विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुस्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यात करणेबाबत नियोजन विभागामार्फत शासन निर्णय निर्गमित

करण्यात आला. तसेच एच.डी.पी.आर. पाईप बाबत दोन वेळा प्रसिद्ध केलेल्या निविदा तांत्रिक कारणास्तव रद्द करण्यात आल्या आहेत. सध्या सदर शासन निर्णयान्वये रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील शेतकऱ्यांना तूरीच्या देयकांची थकीत रक्कम अदा करण्याबाबत

**(३५) * ३३८४३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील तूर विक्रीची कोटयवधी रूपयांची थकीत देयके शेतकऱ्यांना अदा करण्याची मागणी परभणी जिल्हयातील विविध संघटनांनी निवेदनाव्दारे व आंदोलनाव्दारे जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांच्या थकीत देयकांची रक्कम अदा करण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर रक्कम किती मुदतीत शेतकऱ्यांना अदा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही.

भारतीय किसान संघ, पुणे यांनी दिनांक १५/०७/२०१७ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, परभणी यांना दिलेल्या निवेदनात टोकन दिलेल्या तूरीची खरेदी करुन, रक्कम देण्याबाबत मागणी केली आहे.

(२) व (३) परभणी जिल्ह्यात हंगाम २०१६-१७ मध्ये केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत १४०११ शेतकऱ्यांची १७३११३.८५ क्विंटल तूर खरेदी करण्यात आली असून, १३६६८ शेतकऱ्यांना ८५.१२ कोटी रक्कम अदा करण्यात आली आहे.

परभणी जिल्ह्यातील तूर खरेदीचा तपशील खालील प्रमाणे आहे:-

| योजना | खरेदी (क्विंटलमध्ये) | अदा केलेली रक्कम (रुपयांत) |
|---|---|---|
| PSF(FCI) | ९८०७७.३५ | ४९५२९०६१७.५ |
| PSS | २५५६५ | १२९१०३२५० |
| BHY | ४९४७१.५० | २२६८६१११४९ |
| एकूण | १७३११३.८५ | ८५१२५५०१६.५ |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## स्कॉलरशीप व फ्री-शीपसाठी अर्ज करण्यासाठी असलेले संकेतस्थळ बंद असल्याबाबत

**(३६) * ३३६३८ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागामार्फत राजश्री शाहू महाराज यांच्या नावाने मागासवर्गीय विद्यार्थीनींकरीता स्कॉलरशीप व फ्री-शीप करीता www.mahaeschool.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करण्याची सुविधा देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त संकेतस्थळ सतत बंद असल्याने तसेच संकेतस्थळाच्या मुख्य पानावर देण्यात आलेल्या दूरध्वनीवरुन संबंधितांकडे अनेक वेळा तक्रार करुनही तक्रारीचे निवारण होत नसल्याने विद्यार्थीनीना सवलतींपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून काय उपाययोजना करण्यात येत आहेत वा येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: होय.

(२) व (३) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून महा डी.बी.टी. पोर्टल सुरू करण्यात येत असून त्यावर सामाजिक न्याय विभागाच्या अधिनस्थ विविध शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा फी योजनांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

प्रलंबित शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा फी चे प्रलंबित अर्ज त्वरेने निकाली काढण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु असून, पात्र लाभार्थी योजनेपासून वंचित राहणार नाहीत, याची दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## फातिमा चौक ते कोहोजगाव (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) रस्त्यातील रोहित्र हटविण्याबाबत

**(३७) * ३२९९२ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फातिमा चौक ते कोहोजगाव (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) या रस्त्याच्या रुंदीकरणादरम्यान तेथील रोहित्र रस्ताच्या मध्यभागी आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अपघात होण्याची शक्यता निर्माण झाल्याने सदर रोहित्र हटविण्याची मागणी संबंधितानी उप अभियंता, अंबरनाथ यांचेकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर रोहित्राच्या स्थलांतरणाच्या कामाकरिता अधिक्षक अभियंता, महावितरण (कल्याण-२) यांनी रुपये ४,००,३५४/- चे अंदाजपत्रक १.३% सुपर व्हिजन चार्जेस योजनेंतर्गत मंजूर केले असून अतिरिक्त कार्यकारी अभियंता, अंबरनाथ (प.) यांच्यामार्फत दिनांक १५/७/१७ रोजी अंबरनाथ नगरपरिषदेस मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. अद्यापपर्यंत त्यांच्याकडून सदर रक्कमेचा भरणा झालेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कात्रज-अंबेगाव (जि.पुणे) येथील वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या जेवणात अळ्या सापडल्याबाबत

**(३८) * ३२१४१ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कात्रज-अंबेगाव (जि.पुणे) येथील सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या जेवणात अळ्या सापडल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दिनांक २४/०४/२०१७ रोजी सहायक आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी वसतिगृहास प्रत्यक्ष भेट देऊन सदरील परिस्थितीचा आढावा घेऊन भोजन पुरवठादार बदलण्यात आलेला असून सदर भोजन पुरवठादार कंपनीस दंड आकारण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळातील कंत्राटी कामगारांच्या मागण्यांबाबत

**(३९) * ३१०२४ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाची सन २००२ मध्ये स्थापना झाल्यापासून विद्युत सहाय्यक, कनिष्ठ तंत्रज्ञ, उपकेंद्र सहाय्य, ऑपरेटर, कॉल हँडलिंग, बायलर मेंटन्स, साफसफाई, लिपिक, शिपाई इ. पदांवर २२ हजारांपेक्षा अधिक कंत्राटी कामगार काम करीत असून त्यापैकी महानिर्मितीमध्ये १२,५००, महावितरणमध्ये ६,५०० तर महापारेषण मध्ये २,००० इतके कर्मचारी अनेक वर्षापासून कार्यरत आहेत, या कामगारांच्या मागणीच्या अनुषंगाने मा.ऊर्जा मंत्री यांनी रानडे कमिटी आणि भाटीया कमिटी नेमली असून सदरहू कमिटीने केलेल्या शिफारशीची अंमलबजावणीही अद्यापपर्यंत झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कंत्राटी कामगारांनी संयुक्त कृती समितीच्या माध्यमातून केलेल्या सर्व कंत्राटी व आऊट सोर्सिंग कामगारांना जेष्ठतेप्रमाणे कायम करावे, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार समान काम समान वेतन देण्यात यावे, कायम करेपर्यंत रोजंदार कामगार पध्दती सुरू करावी, रोजगारांची हमी द्यावी, वीज कंपन्याच्या परिपत्रकांचे पालन न करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करावी इ. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे प्रकाशगड विभागीय कार्यालय, वांद्रे येथे मागील १५ दिवसांपासून आंदोलन करुनही व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कंत्राटी वीज कामगारांवर झालेला अन्याय विनाविलंब दूर होऊन त्यांच्या मागण्या मान्य होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) कंत्राटी कामगारांच्या मागण्यांच्या अनुषंगाने रानडे समितीचा अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे. समान काम समान वेतन या कंत्राटी कामगारांच्या मागणीच्या अनुषंगाने संचालक (वित्त), म.रा.वि.मं.सूत्रधारी कंपनी मर्या., यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे कामकाज अद्याप सुरु आहे.

(२) व (३) कंत्राटी कामगारांच्या काम बंद आंदोलनावेळी मा.मंत्री (वित्त व वने) व मा.मंत्री (ऊर्जा), कंपनी व्यवस्थापन व संपकरी संघटना यांची दिनांक ३१ मे, २०१७ रोजी बैठक होऊन चर्चा झाली व चर्चेदरम्यान संप मागे घेण्याचे आवाहन करण्यात आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील सेंट्रल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ मास कम्युनिकेशनच्या संचालकांनी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा अपहार केल्याबाबत

**(४०) * ३१५१४ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेंट्रल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडे जमा करण्याचे आदेश मुंबई मा.उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठाने दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी देऊनही सामाजिक न्याय विभागाने उक्त आदेशाचे पालन केले नसल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेंट्रल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ मास कम्युनिकेशनचे संचालक प्रा. सुनिल मिश्रा यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मंजूर झालेली रुपये ५९ लाख २६ हजार ३३/- इतकी शिष्यवृत्तीची रक्कम अवैधपणे काढल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषगांने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशतः होय.

(२) अंशतः होय, नागपूर विद्यापीठाने सदर महाविद्यालयास वेगवेगळया पत्रान्वये निर्धारित करुन दिलेल्या शिक्षण शुल्काच्या दरात तफावत असल्याने मंजूर रकमेत तफावत दिसून येत आहे.

(३) सदर महाविद्यालयाकडून वरील रक्कमेतून रुपये १९ लाख रक्कम समायोजित करण्यात आली असून, उर्वरीत रक्कम महाविद्यालयाकडून वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) सदरहू प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## सातपूर (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीमधील भूखंड वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४१) * ३०९९९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपूर (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीमधील पी १३ या भूखंडाच्या प्रयोजनात औद्योगिक वापरासाठी असा बदल केल्यामुळे तसेच मोकळ्या भूखंडावरील १५ क्रमांकाचा प्लॉट नियमबाह्य पद्धतीने देण्यात येणार असल्याने शासनाचे कोटयवधी रुपयांचे नुकसान होणार असल्याची तक्रार दिनांक १३ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाणिज्य प्रकारातील भूखंड निविदा पद्धती ऐवजी सरळ वाटप पद्धतीने देणार असल्यामुळे यात गैरव्यवहार झाल्याची तक्रार करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) श्री. इंद्रपालसिंग सहानी यांनी दिनांक १३/०३/२०१७ च्या पत्रान्वये भूखंड क्र. पी-१३ बाबत व दिनांक ०५/०३/२०१७ च्या पत्रान्वये भूखंड क्र. ओएस-१५ बाबत तक्रार केलेली आहे.

उद्योग विस्तारासाठी भूखंड वाटपाबाबत महामंडळाने दिनांक २७/०४/२०१२ च्या परिपत्रकान्वये धोरण निश्चित केलेले आहे. त्यानुसार उद्योजकांना प्राधान्याने व विना लिलाव भूखंडाची तरतूद आहे. तसेच पंचनामा करुन परत घेतलेले भूखंड उद्योग विस्तारासाठी वाटप करण्याची तरतूद दिनांक ०३/०६/२०१४ च्या परिपत्रकान्वये केलेली आहे.

वरील धोरणानुसार उद्योग विस्तारासाठी भूखंड वाटपास मे. जोटो ॲब्रेसिव्हज प्रा.लि. ही कंपनी पात्र असल्याने सदर कंपनीस दिनांक ०२/०५/२०१७ च्या बैठकीत क्रमांक पी-१३, क्षेत्र ४०५० चौ.मी. मधून २५०० चौ.मी. वाटपाचा निर्णय घेण्यात आला. सदर निर्णय महामंडळाच्या धोरणानुसार घेण्यात आला आहे. तसेच वृक्षारोपण या प्रयोजनासाठी खुली जागा वाटपाचे महामंडळाचे दिनांक ३१/०१/२००८ व २६/११/२००८ चे धोरण आहे. त्यानुसार भूखंड क्रमांक ओएस १५, क्षेत्र ७९८ चौ.मी. चे वाटप दिनांक १३/०८/२०१५ रोजी पाच वर्षाच्या कालावधीसाठी सदर कंपनीस करण्यात आले आहे. भुखंड क्र.पी. १३ बाबत श्री. इंद्रपाल सिंग सहाणी यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका क्र. ६९२८/२०१७ दाखल केलेली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## कांदिवली (पूर्व) येथील झोपडपट्ट्यांमधील रहिवाश्यांना वीज पुरवठा करण्याबाबत

**(४२) * ३२८३६ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दामुनगर संघर्ष समिती, भीमनगर, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व) येथील वन विभागाच्या जागेत असलेल्या झोपडपट्टीमधील रहिवाशी मागील अनेक वर्षापासून मुलभूत सुविधांपासून वंचित असून येथील रहिवाशी मागील ३० वर्षापासून वीज जोडणीची मागणी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागात काही ठिकाणी रिलायन्स एनर्जी कंपनीच्या संगनमताने वीज पुरवठा केला जात असून उर्वरीत झोपडयांमध्ये वीज पुरवठा नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या झोपडपट्टीतील रहिवाशांना तात्काळ वीज पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) दामुनगर संघर्ष समिती, भीमनगर, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व) हा भाग वन विभागात असल्याने भारतीय वन कायदा, १९२७ व महाराष्ट्र वन नियम, २०१४ तील तरतुदीनुसार आणि मा. उच्च न्यायालय रिट याचिका क्र. ३०५/१९९५ मधील आदेशाप्रमाणे, रिलायन्स एनर्जी या भागात वीज पुरवठा करू शकत नाही.

(२) रिलायन्स एनर्जीने प्रतिबंधित ठिकाणी कोणतीही विद्युत जोडणी दिलेली नाही. अधिनियमाच्या तरतुदीनुसार अनधिकृत जोडण्या रिलायन्स एनर्जीकडून काढून टाकल्या जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात काजू प्रक्रिया उद्योग सुरु करण्याबाबत

**(४३) * ३१०५५ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काजू बागायतदार शेतकऱ्यांच्या काजू बी मालाला कायमस्वरुपी चांगला भाव मिळण्यासाठी तसेच व्यावसायिक लोकांकडून शेतकऱ्यांची फसवणूक होत नये, यासाठी शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने काजू उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून काजू उत्पादक शेतकऱ्यांसाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात काजू प्रक्रिया उद्योग सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) खरे नाही.

शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य दर मिळावा याकरीता कायद्यात बदल करून खाजगी बाजार सुरू करणेसाठी परवानगी, थेट पणन सुरू करण्यास परवानगी, एकल परवाना देणे, तसेच फळ व भाजीपाला नियमन मुक्त करण्यात आले आहेत ई-पणन तसेच गरजेप्रमाणे बाजार हस्तक्षेप योजना राबविण्यात येत आहे. यापुढे ई-पणनचा पुरेसा वापर करणे, आडत्यांचा हितसंबंध दूर करणे, ई-पणनमध्ये इलेक्ट्रॉनिकद्वारे रक्कम अदा करणे, खाजगी बाजार व्यवस्थेत किंमतीमधील फरक आणि पारदर्शकता बाबतचा अभाव दूर करणे, रोख पत मर्यादा ठेवण्याची व्यवस्था करणे, एकल परवाना योजना प्रभावीपणे राबविणे, आधार कार्डवर आधारीत वखार पावत्या देणे व बाजार मध्यस्थ योजना चालू करणेवर भर देण्याचा शासनाचा विचार आहे.

(२) महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या काढणीत्तोर व्यवस्थापन घटकांतर्गत प्राथमिक प्रक्रिया केंद्र उभारणी ही योजना राबविण्यात येत असून सन २००५-०६ ते २०१६-१७ पर्यंत सिंधुदुर्ग

जिल्हयामध्ये ३०९ काजू प्रक्रिया केंद्र उभारणीकरीता रक्कम रूपये ५६५.१६ लाखाचे अनुदान लाभार्थींना वितरीत करण्यात आले आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये प्राथमिक प्रक्रिया केंद्र उभारणी घटकाकरीता भौतिक १० व आर्थिक रक्कम रुपये ९४.०० लाखाची तरतुद कृषी विभागामार्फत करण्यात आली आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## गेवराई (ता.बीड) तालुक्यात संजय गांधी व श्रावण बाळ इ. निराधार योजनांची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(४४) * ३१३२७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यात संजय गांधी व श्रावण बाळ सारख्या निराधार लाभार्थ्यांची प्रकरणे मंजूर करण्यासंदर्भात मागील आठ महिन्यांपासून एकही बैठक न झाल्यामुळे सुमारे सहा हजार अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुकास्तरीय समितीची बैठक नियमित व विहित मुदतीत घेणे, निराधारांचे वेतन अनुदान नियमित आणि महिन्याच्या एक तारखेला व्हावे तसेच प्रलंबित अर्ज निकाली काढणे इ. मागण्यांसाठी अनेक ठिकाणी आंदोलन होऊनही याबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे.

गेवराई (जि.बीड) येथे स्थानिक निवडणूकांच्या आचारसंहितेमुळे संजय गांधी निराधार योजना समितीची बैठक होऊ शकली नाही. तरी प्रलंबित लाभार्थ्यांचे अर्ज निकाली काढण्याबाबत समितीची बैठक घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

या विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या निवृत्तीवेतनाचे वाटप महिन्याच्या एक तारखेस दरमहा करण्याबाबत या विभागाच्या शासन परिपत्रक क्र.विसयो-२०१३/प्र.क्र.४६४/विसयो-१, दिनांक २७ जून, २०१३ अन्वये तसेच शासन पत्र दिनांक १०/०४/२०१५ अन्वये सर्व जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना सूचना देण्यात आल्या आहेत. सदर प्रकरणी तहसिलदार, गेवराई यांची चौकशी करण्यात येऊन कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## बाबुळगाव (जि.यवतमाळ) येथील वीज जोडणीची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(४५) * ३१०७५ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाबुळगाव (जि.यवतमाळ) येथे घेतलेल्या आढावा बैठकीत कृषी पंप वीज जोडणीसाठी रुपये १५२ कोटी मंजूर करण्यात येऊन संबंधित प्रलंबित कामे पूर्ण करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी पंप वीज जोडणीच्या प्रतीक्षेत असलेल्यांसाठी रुपये १५२ कोटी मंजूर होऊनही एकही मीटर बसवल्याची नोंद वीज वितरण कार्यालयात उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) महावितरण कंपनीकडून यवतमाळ जिल्हयामध्ये सन २०१६-१७ मध्ये एकूण ७२३६ कृषीपंप वीज जोडण्या देण्यात आल्या असून सन २०१७-१८ मध्ये मे, २०१७ अखेरपर्यंत ३६४ वीज जोडण्या दिल्या आहेत व मे, २०१७ अखेर ६१४१ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित असून त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिवणगाव (जि.नागपूर) येथील प्रकल्पग्रस्तांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४६) * ३२८२८ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवणगाव (जि.नागपूर) येथील एक हजारापेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्पासाठी संपादित करुन त्यांना अल्पसा मोबदला देण्यात आला परंतु स्वंयरोजगारासाठी १२.५ टक्के जमीन वा नोकरी अद्याप देण्यात आली नसल्याचे माहे जून, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना १२.५ टक्के विकसित जमीन देतांना एमआयडीसी प्रकल्पग्रस्तांकडून प्रति एकर ७१ लाख रुपये विकास शुल्क व एका एकरातून ३०% जमीन रस्ते, वीज व पायाभूत सुविधांसाठी स्वत:कडे ठेवणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना योग्य मोबदला, स्वयंरोजगारासाठी जमीन किंवा नोकरी देण्याबाबत तसेच यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे शिवणगाव येथील संपादित जमिनीपोटी संबंधित बहुतांश भूधारकांना शीघ्रगणक दर व खरेदी विक्री दरपत्रक या दोहोंमधील अधिकतम फायदेशीर दर निवाड्यात मंजूर करुन अदा करण्यात आला आहे. १२.५ टक्के विकसित जमीन घेण्याकरिता सध्या ३५३ बाधित भूधारकांनी इच्छुकता दर्शविल्यानुसार त्यांना माजे सुमठाणा येथे विकसित भूखंड वाटप प्रस्तावित आहे. याशिवाय, १६३७ प्रकल्पग्रस्तांना नोकरीऐवजी प्रत्येकी रु.५ लक्ष पुनर्वसन अनुदान अदा करण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

प्रकल्पग्रस्तांना १२.५ टक्के विकसित जमीन देतांना शासन निर्णयातील सूत्रानुसार जमीन शुल्क व विकास शुल्क यांसाठी एकत्रितपणे प्रति हेक्टरी रु.७१.०० लक्ष शुल्क आकारण्यात येत आहे. तथापि, भूधारकांनी केलेल्या मागणीनुसार जमीन शुल्क वगळता फक्त विकास शुल्क घेण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सदर विकसित जमीन देतांना ३० टक्के राखून ठेवण्यात येणारी जमीन प्रकल्पग्रस्तांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी उपयोगात आणली जाणार आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बांधपाडा (ता.उरण, जि.रायगड) येथील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(४७) * ३२४६९ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १९४७६ ला दिनांक २९ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांधपाडा (ता.उरण, जि.रायगड) येथील अमेया लॉजिस्टीक कंपनीने केलेला माती भराव व केमिकलयुक्त दूषित सांडपाणी श्री. स्वप्निल दिपक ठाकूर व श्री.राजेंद्र पंढरीनाथ ठाकूर यांच्या भात पिकाखालील जमिनीत सोडल्याने नापिक झालेल्या जमिनीची दिनांक १४ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन सादर करून मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसिलदार, उरण यांचेकडील दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ अन्वये नुकसान भरपाई देण्याबाबत सूचना देवूनही अद्यापपर्यंत संबंधितांना नुकसान भरपाई देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) अमेया लॉजिस्टिक कंपनीने यासंदर्भात दिनांक ०१/०६/२०१६ रोजी तहसिलदार उरण यांना सादर केलेल्या अहवालात कंपनीने सांडपाण्याची योग्य व पुरेपूर विल्हेवाट लावण्यासाठी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यास STP PLANT बसविलेले आहेत, प्रक्रिया केलेल्या आवारांतील बागबगीच्यासाठी पुर्नवापर केला जातो. तसेच सदर कंपनी फक्त कंटेनर हाताळणीचा व्यवसाय करत असून कंपनी कोणत्याही प्रकारचे केमिकल उत्पादन करत नसल्याने केमिकलयुक्त दूषित पाणी शेतात जावून शेती नापिक होण्याचा प्रश्न उद्‌भवत नसल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे कंपनीने नुकसानग्रस्तांना भरपाई रक्कम अदा केलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्हयातील शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत

**(४८) * ३३७११ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात शासनाकडून वेळेवर अनुदान मिळत नसल्यामुळे शेतीपंपाची कनेक्शन प्रलंबित राहिली असून पाण्याअभावी पीके जळून गेली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सातारा जिल्हयातील शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) सातारा जिल्हयात सन २०१६-१७ मध्ये विविध योजनांतर्गत ५४०९ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. सदर जिल्हयात मार्च २०१७ अखेर १०६३० कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. त्यापैकी सन २०१७-१८ मध्ये विविध योजनांतर्गत १०२२ कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्यात आले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेतील गैरव्यवहाराबाबत

**(४९) * ३३८८० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २७७७५ ला दिनांक १४ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेतील बिगर शेती तारण कर्ज, वाहन कर्ज, ठेवी, नियमबाहय कर्ज वाटप, अफरातफर व इतर गैरप्रकारास जबाबदार धरून बॅंकेच्या आर्थिक नुकसानीची तसेच गैरव्यवहाराची जबाबदारी निश्चित करण्याबाबत जिल्हा उपनिबंधक, परभणी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ७२ (३) नुसार संचालक व अधिकारी यांना नोटीसी जारी केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने दिनांक २९ ऑगस्ट, २०११ रोजीच्या नोटीसप्रमाणे जबाबदार असलेल्या दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) प्राधिकृत अधिकारी यांचे दिनांक ११/०५/२०१२ च्या अहवालानुसार ३३ संचालक व ३ तत्कालीन कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित केली होती. सदर आदेशाविरूध्द बॅंकेच्या आजी व माजी संचालक यांनी शासनाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम १५२ खाली केलेल्या अपीलामध्ये शासनाने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, परभणी यांचे दिनांक ११/०५/२०१२ चे आदेश रद्द केले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळंब (ता.कर्जत, जि.रायगड) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळा बंद करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(५०) * ३३८१४ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (ता.कर्जत, जि.रायगड) येथील सन २०१६-१७ चे शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर आदिवासी विकास विभागाने माहे मे, २०१७ मध्ये शासकीय आदिवासी आश्रमशाळा बंद करण्याचा निर्णय घेतला असून सदर आश्रमशाळेतील १६१ विद्यार्थ्यांना शाळेचा दाखला देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी मुलांना कोणत्याही शाळेत प्रवेश न मिळाल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) सदर शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी असल्याने सदर विद्यार्थ्यांचे जवळच्या इतर शाळेत समायोजन करण्यांत आले आहे.

(२) सदर शाळेतील मुलांना पालकांच्या पसंतीनुसार जवळच्या जिल्हा परिषद शाळा, कळंब, शासकीय आश्रमशाळा, सासणी, अनुदानित आश्रमशाळा, लव्हाळी, जिल्हा परिषद शाळा, वांगणी या शाळेत प्रवेशित झाले आहेत. त्यामुळे सदर शाळेतील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हा बँकेला अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५१) * ३१००१ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आर्थिकदृष्टया अडचणीत आली असून आगामी खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा न होणे, शेतकरी, शिक्षक व सर्वसामान्य ग्राहकांना त्यांचे खात्यात शिल्लक ठेवी असूनही पैसे मिळत नसणे इ. कारणांमुळे बँकेतील रोख व्यवहार पुर्णतः बंद झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोटा बंदीनंतर जिल्हा बँकांच्या शाखांमध्ये जमा झालेल्या रुपये ३४१ कोटींच्या जुन्या चलनातील नोटांबाबत आवश्यक चौकशी न होणे व सदरील जुन्या नोटा बदलून न मिळणे यामुळे बँकेचे व्यवहार बंद होणे तसेच याबाबत उच्चस्तरावरून कोणताही निर्णय घेण्यात येत नसल्याने आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकरी, शिक्षक व सर्वसामान्य ग्राहक यांचेसाठी शासनाने नाशिक जिल्हा बँकेला अतिरिक्त निधी उपलब्ध करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा बँकेकडे शिक्षकांच्या वेतनाची रक्कम नियमित वर्ग करूनही त्यांना वेतन मिळत नसल्याने शिक्षकांनी संपूर्ण नाशिक जिल्ह्यात मोर्चे, उपोषण, धरणे, बँक शाखांना टाळाबंदी, घेराव इत्यादी मार्गांनी आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) नोटाबंदी व चलन तुटवड्याच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला आहे. रिझर्व्ह बँकेने दिलेल्या निदेशाप्रमाणे नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दिनांक १२/७/२०१७ रोजी रुपये ३१९.६८ कोटी इतक्या रक्कमेच्या जुन्या नोटा रिझर्व्ह बँकेच्या

मुंबई मुख्यालयात जमा केल्या व त्यापोटी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत दिनांक १३/७/२०१७ रोजी रुपये ३१९.६८ कोटी इतकी रक्कम जिल्हा बँकेच्या खाती जमा करण्यात आली आहे. उर्वरित रुपये २१.३२ कोटी रक्कम स्विकारणेबाबत रिझर्व्ह बँकेकडे पाठपुरावा चालू आहे.

-----------------

## परभणी तसेच राज्यातील इतर जिल्हा बँकांच्या सक्षमीकरणाबाबत

**(५२) * ३१११३१ श्री.नारायण राणे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांच्या हितासाठी सदरील बँकेचे तसेच राज्यातील इतर आर्थिकदृष्टया अवसायनात असलेल्या जिल्हा बँकांचे महाराष्ट्र राज्य सहकारी बँक या शिखर बँकेत विलीनीकरण करण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री यांनी सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे राज्यातील ग्रामीण भागातील कृषी अर्थकारण व सहकारी चळवळीचे अस्तित्व धोक्यात येणार असल्याचे मत या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्हा बँकांचे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत विलीनीकरण न करता या बँकाच्या सक्षमीकरणाकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही, राज्यातील एकही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अवसायनात नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे यांचेकडून अनुदान वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५३) * ३११४४ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील आदिवासी विकास विभागाच्या ठाणे अप्पर आयुक्त कार्यालयांतर्गत अनुसूचित जमातीच्या दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्यांना मोगरा व हळद लागवडीसाठी अर्थसहाय्य वितरण करताना बोगस लाभार्थी दाखवणे तसेच शेडनेट उभारणी अनुदानात गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे अंशत: खरे आहे,

एकात्मिक आदिवासी प्रकल्प, घोडेगाव यांचे कार्यक्षेत्रात या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनियमिततेबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या याबाबत प्राथमिक चौकशी करण्यात आली असून मोगरा व हळद लागवड या योजना पूर्ण झाल्या असून शेडनेट उभारणी ही योजना प्रगतीत आहे. तथापि योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही केली नसल्याची बाब निर्दशनास आली आहे.

(२) सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी केली असून चौकशीतील निष्कर्षाच्या आधारे वर्ग-३ च्या ५ कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली आहे तसेच वर्ग-१ ते वर्ग-२ अधिका-याचे दोषारोप पत्र बजावण्याची कार्यवाही सरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत

**(५४) * ३३१९९ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील कोटयवधी रुपयाच्या शासकीय रोखे खरेदी-विक्री गैरव्यवहाराची चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर दबावतंत्राचा वापर होत असल्याचे माहे मे, २०१७ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख : (**१) नाही, हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना नियमित भोजन पुरवठा करण्याबाबत

**(५५) * ३२४८२ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १६६४८ ला दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या १०० मागासवर्गीय वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करण्यासाठी कंत्राटदारांकडून सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेला काही व्यक्तिंनी मा.उच्च न्यायालयात आव्हान (याचिका दाखल) केल्याने नवीन निविदा प्रक्रिया देखील पूर्ण होऊ शकली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाच्या परवानगीने पूर्वीच्याच कंत्राटदारांना केवळ मार्च, २०१६ पर्यंत मुदत वाढ देण्यात येऊन वसतिगृहांमधील कंत्राटदारांना मागील ७ महिन्यांपासून भोजन पुरवठ्याची रक्कम मिळाली नसल्याने ते भोजन पुरवठा बंद करणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा सुरळीत सुरु राहण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन ठेकेदाराची निवड पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीपर्यंत अथवा कमाल तीन महिने कालावधीसाठी पुर्वीच्याच भोजन पुरवठादारांना मुदतवाढ देण्याची बाब प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.